# मालेगाव प्रकरणीही सर्वोच्च न्यायालयात जाणार का - हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

काँग्रेस पक्ष नेहमीच दहशतवादाच्या विरोधात राहिलेला आहे. महात्मा गांधी, इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या बलिदानाने काँग्रेसने दहशतवादाची मोठी किंमत मोजलेली आहे. या दहशतवादाला कोणताही रंग नसतो दहशतवादी हा दहशतवादीच असतो, त्याला शिक्षा झाली पाहिजे असे स्पष्ट करत मुंबई रेल्वे स्फोटाच्या निकालावर राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जाणार आहे तसेच मालेगाव बॉम्बस्फोटाच्या निकालावरही सर्वोच्च न्यायालयात जाणार का, हे स्पष्ट करावे अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मालेगावात बॉम्बस्फोटाच्या निकालावर टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, मालेगावमध्ये २००८ साली झालेल्या बॉम्बस्फोटात ६ लोक ठार तर १०० वर जखमी झाले ही वस्तुस्थिती आहे. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, गृहमंत्री आर. आर. पाटील व या प्रकरणाचा तपास करणारे अधिकारी हेमंत करकरे यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला होता, त्यांचे आज स्मरण होत आहे तसेच "केंद्रात सत्ताबदल झाल्यानंतर मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपींबद्दल सौम्य भूमिका घ्यावी,असे तपास यंत्रणा एनआयएच्या अधिकाऱ्याने सांगितले होते", या विशेष सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी केलेले वक्तव्यही आजच्या निकालानंतर महत्वपूर्ण ठरत आहे.

**बॉम्बस्फोट कोणी केला हा प्रश्न अनुत्तरित**

सपकाळ पुढे म्हणाले की, न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष सुटका केली आहे पण हा बॉम्बस्फोट कोणी केला हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहतो. सरकारची भूमिका दहशतवादविरोधी असायला पाहिजे. रेल्वे स्फोटाच्या निकालावर जर सर्वोच्च न्यायालयात जाण्याची भूमिका आहे तर मालेगाव बॉम्बस्फोटाच्या निकालावरही सर्वोच्च न्यायालयात जावे लागेल, सरकारला दुटप्पी भूमिका घेता येणार नाही. आज जसे आरोपी निर्दोष सुटले तसेच स्वातंत्र्यानंतरचा देशातील पहिला दहशतवादी नथुराम गोडसेने महात्मा गांधी यांची हत्या केली. या प्रकरणातील ७ आरोपींपैकी ६ जणांना शिक्षा ठोठावली पण सावरकर यांची निर्दोष मुक्तता झाली. या प्रकरणातील कपूर आयोगाच्या अहवालात सावरकरांवर ठपका ठेवलेला आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# सिडकोतर्फे नवी मुंबई आणि नैना शहराकरिता सर्वसमावेशक आणि शाश्वत परिवहन आराखडा तयार करण्यात येणार

## २०५४ पर्यंत शाश्वत आणि सर्वसमावेशक परिवहन धोरणाची रूपरेषा

**नवी मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

सिडकोतर्फे नवी मुंबई आणि नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र) शहराकरिता सर्वसमावेशक परिवहन आराखडा (Comprehensive Mobility Plan - CMP) तयार करण्यात येणार आहे. सन 2054 पर्यंत पर्यावरणदृष्ट्या शाश्वत आणि सर्वसमावेशकतेवर आधारित परिवहन धोरण निर्माण करणे, सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक, वाहतुकीच्या सर्व साधनांचे एकात्मीकरण, सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता सदर आराखडा तयार करण्यात येणार आहे. या आराखड्यामध्ये सार्वजनिक वाहतूक, खासगी वाहने व चालणे आणि सायकलिंग यांसारख्या गैरस्वयंचलित परिवहन प्रकारांचे एकात्मीकरण करून साकल्यवादी दृष्टीकोनातून परिवहनाचे नियोजन करणे अभिप्रेत आहे. वेगाने होणारे शहरीकरण, वाढती लोकसंख्या, लोकसंख्येची दाटीवाटी आणि पर्यावरणीय मुद्दे, या भविष्यातील आव्हानांवर मात करण्यासाठी सीएमपी आराखडा तयार करण्यात येणार आहे.

परिवहनाच्या पायाभूत सुविधांचा विचार करता सद्यस्थितीत नवी मुंबईमध्ये ठाणे-बेलापूर मार्ग, पाम बीच मार्ग, शीव-पनवेल महामार्ग, अटल सेतू यांसारख्या महत्त्वाच्या मार्गांसह 980 कि.मी. चे विभागीय व अंतर्गत रस्त्यांचे जाळे, 60 कि.मी. हून अधिक लांबीचे रेल्वे मार्ग, नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. 1 बेलापूर ते पेंधर दरम्यान मेट्रो सेवा तसेच नवी मुंबई महानगरपालिका, बेस्ट, एमएसआरटीसी इ. प्राधिकरणांच्या बस सेवा स्थानिक व प्रादेशिक कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावित आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह अटल सेतू, मेट्रो मार्ग क्र. 8 (नमुंआंवि व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणारा), पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे मार्ग, बेलापूर ते नमुंआंवि दरम्यान मेट्रो मार्ग क्र. 1 चा विस्तार या परिवहन प्रकल्पांमुळे एकात्मीक परिवहन धोरण निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.





> "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, एरोसिटी, एज्युसिटी, लॉजिस्टीक पार्क, मेडीसिटी या प्रकल्पांसह निवासी व औद्योगिक वाढ, या घटकांमुळे नवी मुंबईतील वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई क्षेत्राकरिता सिडको व अन्य प्राधिकरणांना वैविध्यपूर्ण, सर्वसमावेशक आणि भविष्यसिद्ध परिवहन प्रणाली विकसित करण्याकरिता सीएमपी मार्गदर्शक ठरणार आहे."
>
> **विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या पार्श्वभूमीवर परिवहन व्यवस्थेतील त्रुटी, गुंतवणुकीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करणे, परिवहनाच्या स्थानिक व प्रादेशिक गरजांना अनुसरून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करता येईल असा रोडमॅप तयार करणे, याकरिता सीएमपी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. तसेच मेट्रो व अन्य सार्वजनिक परिवहन प्रकल्पांकरिता केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडून निधी उपलब्ध करून घेण्याकरिता देखील सीएमपी अनिवार्य आहे.

सीएमपीद्वारे नवी मुंबई आणि नैना यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी, जेएनपीटीतर्फे प्रस्तावित उत्पादन केंद्र, एनएमआयआयए, कॉर्पोरेट पार्क, एरोसिटी इ. महत्त्वाच्या प्रकल्पांसोबत एकात्मीकरण करणे, नवी मुंबई आणि नैना क्षेत्रातील कार्यक्षम चलनशीलतेकरिता पर्यावरणदृष्ट्या शाश्वत आणि समन्यायी तत्त्वावर आधारित दीर्घकालीन परिवहन धोरण तयार करणे, राष्ट्रीय नागरी परिवहन धोरणानुसार नवी मुंबई आणि नैना क्षेत्रामध्ये गैरस्वयंचलित व सार्वजनिक परिवहन प्रकारांना चालना देणे, एमएमआर अद्ययावतीकरण सविस्तर अभ्यास जाळ्याकरिता नवी मुंबई व नैनामधील जाळ्याचे सीटीएससोबत एकत्रिकरण करणे, वाहतूक परिचालन व रस्ते सुरक्षेमध्ये सुधारणा करण्याकरिता उत्तम वाहतूक अभियांत्रिकी पद्धतिंची अंमलबजावणी करण्यासह परिवहन जाळ्याचा विकास करणे, पुरेशा वाहतूक व्यवस्थापन उपायोजनांचे पूर्वनियोजन करणे, या उद्दिष्टांची पूर्तता होणार आहे.

## कुर्ला येथील भाभा रुग्णालयातील रुग्णांचे हाल!

# औषधांचा साठा संपला, उपकरणांमध्येही बिघाड

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

मुंबईतील कुर्ला येथील भाभा रुग्णालयात औषधांचा साठा संपला आहे तसेच महत्त्वाच्या उपकरणांमध्येही बिघाड झाल्याची माहिती समोर आली. त्याचा रुग्णसेवेवर परिणाम झाला आहे. रुग्णांना बाहेरून आवश्यक औषधे खरेदी करावी लागत आहे. शिवाय, निदान चाचण्यांसाठी खाजगी प्रयोगशाळांमध्ये जावे लागत आहे. महत्त्वाचे म्हणजे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले लोक भाभा रुग्णालयात उपचार घेतात. मात्र, गेल्या दोन आठवड्यांपासून औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांवर स्व:खर्चाने औषध खरेदी करण्याची वेळ आली आहे. बीएमसीच्या रुग्णालयांपैकी एक म्हणून





भाभा हे स्थानिक आरोग्यसेवेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. भाभा रुग्णालय हे ३३६ खाटांचे रुग्णालय असूनही, त्यापैकी फक्त २७० खाटा कार्यरत आहेत. क्षमता असूनही रुग्णालयाला सेवांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. दरम्यान, कुर्ला, नेहरू नगर, चुनाभट्टी, चेंबूर, टिळक नगर आणि घाटकोपर येथील नागरिक भाभा रुग्णालयात उपचार घेतात, जे पूर्णपणे महानगरपालिकेच्या आरोग्यसेवेवर अवलंबून असतात. दररोज सुमारे १,७०० ते २००० रुग्ण रुग्णालयाच्या ओपीडीमध्ये येतात. औषधाच्या कमतरतेव्यतिरिक्त रुग्णालय कर्मचाऱ्यांची कमतरता आणि प्रमुख निदान उपकरणांमध्ये वारंवार बिघाड, यांसारख्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. कार्यरत नसलेल्या यंत्रांमुळे किंवा दुरुस्तीमध्ये विलंब झाल्यामुळे रुग्णांना अनेकदा वैद्यकीय चाचण्यांसाठी दुसरीकडे पाठवले जात आहे. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी तातडीने पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत रुग्णांना अशाप्रकारच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल, यात काही शंका नाही.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ' स्वाधार ' धर्तीवर विशेष योजना प्रस्तावित-दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**



शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या इयत्ता ११ वी, १२ वी तसेच उच्च शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक त्या भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वाधार' योजनेच्या धर्तीवर विशेष योजना प्रस्तावित केली असल्याची माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

मंत्रालयात मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग कल्याण विभागाच आढावा घेण्यात आला यावेळी दिव्यांग कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त समीर कुर्तकोटी, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी अतुल वझे तसेच दिव्यांग कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री सावे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्वसमावेशक शिक्षणाची तरतूद करण्यात आली असून, त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिव्यांग विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने सर्वसाधारण शाळांमध्ये समाविष्ट करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या समन्वयाने दीर्घकालीन धोरण तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्रधान सचिव शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# काही सेकंदांच्या फरकाने हुकली जय जवानची संधी

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

प्रो-गोविंदा लीगचे दोन वेळचे विजेता असलेले जोगेश्वरीतील प्रसिद्ध जय जवान गोविंदा पथकाला यावर्षी स्पर्धेबाहेर राहावे लागले आहे. ऑनलाईन नोंदणी दिलेल्या वेळेपेक्षा काही सेकंदाच्या फरकाने करणे त्यांना महागात पडले आहे. दरम्यान, निर्णय प्रक्रियेचा आदर राखत आयोजकांचा निर्णय मान्य आहे. आम्ही आत्मपरीक्षण करू, असे जय जवान गोविंदा पथकाचे अध्यक्ष संदीप ढवळे यांनी सांगितले.

प्रो-गोविंदा लीग स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाच्या नोंदणी प्रक्रियेत राज्यभरातून एकूण 127 गोविंदा पथकांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेच्या नियमानुसार सर्वप्रथम नोंदणी करणाऱ्या 32 संघांना स्पर्धेत स्थान स्थान दिले जाणार होते. जय जवान गोविंदा पथक हे नोंदणी प्रक्रियेत 41 व्या स्थानी होते. जय जवान गोविंदा पथकाचे व्यवस्थापक विजय निकम यांनी सांगितले की, प्रो- गोविंदा लीगच्या तिसऱ्या पर्वासाठी 10 जून ते 14 जून 2025 या कालावधीत नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम 32 संघांची यादी प्रसिद्ध करण्याचे नियोजित होते. 10 जून रोजी सायंकाळी 6 वाजता नोंदणीची लिंक सुरू होणार होती, मात्र दुपारी 12 वाजताच नोंदणी प्रकियेला सुरुवात झाली. आम्ही सर्व खबरदारी घेऊन नोंदणी करीत होतो. मात्र, संकेतस्थळ संथगतीने सुरू होते. तरीही 12 वाजून 4 मिनिटांनी आमची नोंदणी पूर्ण झाली. त्यानंतर 14 जूननंतर प्रसिद्ध होणारी अंतिम 32 संघांची यादी 12 जूनलाच प्रसिद्ध झाली. तेव्हा 31 व 32 व्या क्रमांकावरील गोविंदा पथकाची नोंदणीची वेळही 12 वाजून 4 मिनिटे होती, मात्र आम्हाला संधी देण्यात आली नाही. परिणामी, आमच्या तीन महिन्याच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. मात्र, जय जवान गोविंदा पथकाचा वरळीतील 5 जुलैच्या मराठी भाषेसंबंधित विजयी मेळाव्यामध्ये सहभाग आणि प्रो-गोविंदा लीगच्या स्पर्धेतून बाहेर पडणे, या दोन्ही गोष्टींचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**आरोपांमध्ये काहीच तथ्य नाही**

आयोजकांनीही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राजकारण करून आयोजकांनी जय जवान गोविंदा पथकाला बाद केले, या आरोपांमध्ये काहीच तथ्य नाही. जय जवान गोविंदा पथक हे नोंदणी प्रक्रियेत 41 व्या स्थानी होते. तसेच गतवर्षी दुसऱ्या क्रमांकावर असलेले बालवीर गोविंदा पथक नोंदणी प्रक्रियेत 37 व्या क्रमांकावर होते. आम्ही दुपारी 12.04 वाजता नोंदणी केली असा जय जवान पथकाचा दावा आहे. मात्र, खोपटचा राजा आणि नूतन बालवाडी पथकाचीही नोंदणीची वेळही 12.04 वाजताची आहे. जय जवान पथक काही सेकंदांनी मागे पडले.

# मंत्र्यांचे ओएसडी असल्याची बतावणी; सहा कोटींना गंडा

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

शासकीय रुग्णालयांसाठी लागणाऱ्या बाराशे खाटांच्या कंत्राटाचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची सहा कोटींची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी नितीन गुप्ता, रमेश बनसोडे, बालाजी पवार, उद्धव भामरे आणि कौस्तुभ भामरे या पाच जणांविरुद्ध वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यातील नितीन हा तक्रारदार व्यावसायिकाचा कामगार सल्लागार तर इतर चौघे हे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी असल्याचे सांगण्यात आले होते. दिडशे कोटीच्या कंत्राटाचे गाजर या व्यवसायिकाला दाखवण्यात आल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

फसवणूक झालेले तक्रारदार हे विद्याविहार येथील रहिवासी असून त्यांचा लाकडी आणि मेटल फर्निचरचा व्यवसाय आहे. मार्च महिन्यात त्यांचा कामगार सल्लागार नितीन गुप्ताने त्यांची इतर आरोपींबरोबर भेट घडवून आणली. यावेळी अरोपी रमेश बनसोडे हे माजी मंत्री, बालाजी पवार हे आरोग्यमंत्री तर उद्धव भामरे हे अन्न व औषध कार्यालयात ओएसडी तर कौस्तुभ हा वरिष्ठ आयएएस अधिकारी आहेत अशी ओळख करुन दिली. आरोपींनी शासकीय रुग्णालयांसाठी दिडशे कोटींचे बाराशे आयसीयू खाटांचे कंत्राट देण्याचे आश्वासन दिले. ही ऑर्डर त्यांच्या कंपनीला मिळाल्यास मोठा फायदा होणार असल्याचे आमिष दाखवण्यात आले. कंत्राट देण्यासाठी आरोग्यमंत्र्यांना 30 कोटी तर इतर मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कमिशन म्हणून सहा कोटी रुपये कमिशन द्यावे लागतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदारानके या पाचजणांना टप्प्याटप्प्याने सहा कोटी रुपये दिले होते. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच त्यांनी पाचही आरोपीविरुद्ध वांद्रे पोलिसात तक्रार केली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर आरोपींविरुद्ध तोतयागिरी करुन बोगस दस्तावेज सादर करुन सहा कोटीचा अपहार करुन तक्रारदार व्यावसायिकाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत वांद्रे पोलिसांना तपासाचे आदेश दिले आहेत.

# राज्यात अजूनही ५ लाखांवर विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

कमी गुण असूनही अनेकांनी नामवंत महविद्यालये निवडल्याने तसेच पसंतीक्रमाच्या घोळामुळे अकरावी प्रवेशात अनेकांना चौथ्या यादीतही प्रवेश मिळालेला नाही. अजूनही राज्यातील तसेच महामुंबईतील हजारो विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. राज्यात लाखो विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतिक्षेत असूनही केवळ 83 हजार 944 विद्यार्थांना प्रवेश मिळाला आहे. तर मुंबईतील केवळ 18 हजार 474 विद्यार्थ्यांचा या यादीत समावेश आहे. यामुळे 5 लाख 43 हजार 516 विद्यार्थ्यांना आता पुढील फेरीची वाट पहावी लागणार आहे.

राज्यभरातून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी 14 लाख 29 हजार 234 विद्यार्थ्यांनी केलेली आहे. प्रवेशाच्या नियमित फेरी एक व दोन मध्ये 7 लाख 20 हजार 666 विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित केला आहे. तर नियमित तिसर्या फेरीत 1 लाख 11 हजार 235 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यापैकी 93 हजार 061 विद्यार्थांनी महाविद्यालयात प्रवेश घेतले. त्यानुसार तिसऱ्या यादी अखेर राज्यात 8 लाख 13 हजार 727 विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.



बुधवारी सायंकाळी जाहीर झालेल्या चौथ्या फेरीमध्ये राज्यात 83 हजार 944 विद्यार्थांना प्रवेश देण्यात आले आहेत. या यादीतही नामवंत महाविद्यालयांच्या प्रत्येक शाखेच्या कट-ऑफमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. 80 ते 70 टक्के व त्यापेक्षा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या महाविद्यालयाच्या पसंतीक्रमाचा पुनर्विचार करावा लागणार आहे. तिसऱ्या यादीत एचआर महाविद्यालयात वाणिज्य शाखेचा कट-ऑफ 98 टक्क्यांवर गेला होता. विल्सन महाविद्यालयात तिसऱ्या यादीत कला शाखेसाठी 71 टक्के मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला होता.

चौथ्या यादीत हा टक्का 71.4 वर गेला आहे. रुपारेल महाविद्यालयात कला शाखेसाठी तिसऱ्या यादीत 84.4 टक्के मिळवलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळाला. पण चौथ्या यादीचा कट-ऑफ 85.2 टक्क्यांवर गेला आहे. कमी टक्के मिळालेल्या विद्यार्थ्यांना आता त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमाबाबत विचार करावा लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय अलॉट झाले आहे, 2 ऑगस्टपर्यंत प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करायचा आहे. असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# गणेशोत्सवात खड्डेविघ्न टळणार

**मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

गणेश चतुर्थी 27 ऑगस्टला असली तरी 2 ऑगस्टपासून मोठ्या मंडळांच्या गणेशमूर्तींचे आगमन सुरू होणार आहे. मात्र, पावसामुळे अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने, प्राधान्याने खड्डे दुरुस्ती हाती घेतली जाणार असून गणरायाच्या आगमन व विसर्जन मार्गात यावर्षी खड्डे विघ्न नसेल असा दावा केला आहे. मुंबई महापालिकेने हाती घेतलेली मिशन रस्ते काँक्रिटीकरण50 टक्के पर्यंतच पूर्ण झाले आहे. त्यामुळे यावर्षीही पावसाळ्यात मुंबईत मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. महापालिकेने तत्काळ खड्डे बजविण्यासाठी मुंबईकरांसाठी पोटहोल क्विकफिक्स ॲप ही सुविधा उपलब्ध करून दिली होती. या ॲपवर आतापर्यंत मुंबईकरांनी सात हजारांपर्यंत खड्डे पडल्याच्या तक्रारी नोंदवल्या आहेत. यावरून मुंबईत या वर्षी गणरायाचे आगमन व विसर्जनात खड्डे विघ्न असणार आहे. मात्र, महापालिकेने तक्रारींचा तत्काळ निपटारा केला जात असून आतापर्यंत साडेचार हजारांपर्यंत खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे. आता गणपती आगमन व विसर्जन मार्गांवर पालिकेने लक्ष केंद्रीत केले आहे. गणेश चतुर्थी 27 ऑगस्टला असल्यामुळे मुंबई बाहेरील गणपती बाप्पांचे आगमन होऊ लागले आहे. 2 ऑगस्टपासून मुंबईतील काही गणेशोत्सव मंडळाच्या बाप्पांचे आगमन होणार आहे. या आगमनाच्या वेळी खड्ड्यांचे विघ्न नको म्हणून तत्काण दुरुस्ती मोहीम हाती घेतली असून शहर, पश्चिम व उपनगरात एकाचवेळी खड्डे बुजवले जाणार आहेत. मुंबईतील लालबाग, परळ, गिरगाव व दादर येथील प्रमुख रस्ते हे महत्त्वाचेगणरायचे आगमण मार्ग आहेत. तर गिरकाव, दादर, माहीम, जुहू, वेसावे, सात बंगला, गोराई या चौपाट्यांकडे जाणारे विसर्जन मार्ग असून येथील खड्डे तत्काळ बुजवावेत असे पालिका आयुक्तांनी निर्देश दिले आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या 10 ते 30 फुटापर्यंत उंच मुर्ती असतात. खराब रस्त्यांमुळे गणेश मूर्तींची ट्रॉली खड्ड्यात फसणे, मूर्तीला तडे जाणे, मूर्ती बॅलन्स न होणे, आदी भीती असते. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही मागणी केली आहे.

2 ऑगस्ट व त्यानंतर येणाऱ्या शनिवार आणि रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी मुंबईच्या परेल वर्कशॉप व भारतमाता येथून मोठ्या प्रमाणात गणेशाचे आगमन होणार आहे. आगमन व विसर्जन दरम्यान लटकणारे केबल, वाढलेल्या फांद्या तसेच भारतमाता, डिलाई रोडवर असलेले सिग्नलचे पोल बदलणे, लालबाग परिसरातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवणे, रस्त्याच्या दुतर्फा पार्किंग केलेल्या गाड्या हटवण्याची मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी केली आहे.


ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
Mobile: +91 8451942710 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सार्वजनिक सूचना खालीलप्रमाणे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/सह कर्जदार/गॅरंटीदार यांना देण्यात येत आहे की खाली दिलेल्या शेड्यूलमध्ये वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड **["ARGFL"]**(सुरक्षीत कर्जदार) कडे कर्ज खाता क्रमांक **APPL00013906** अंतर्गत ठेवलेली आहे, हिचा विक्रीचा विचार ई-ऑक्शनद्वारे **https://www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर त्याच शेड्यूलमध्ये विशेषत: दिलेल्या तारखेला जस आहे तसे आणि जस आहे काय आणि जसे आहे तसा आधारावर करण्यात येईल. या विक्रीचा उद्देश कर्जदार/सह कर्जदार/गॅरंटीदार यांच्याकडून दिलेल्या शेड्यूलमध्ये विशेषत: दिलेली एकूण रक्कम आणि त्यावर संबंधित व्याज आणि इतर खर्च व शुल्क यांची वसुली करणे आहे, जोपर्यंत रक्कम पूर्णपणे वसूल केली जात नाही.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: १) श्री राजेश कुमार रवींद्र चक्रवर्ती, ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती ज्योती गुलाटी चक्रवर्ती, ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| मालमत्तेचे तपशील: मालमत्तेचे तपशील: फ्लॅट क्र. ११०१, ११वा मजला, अरुंधती हाईट्स, प्लॉट नं. ३५, स्वस्तिक पार्क, मंगल आनंद हॉस्पिटलजवळ, दीपक कुंदर मार्ग, सीटीएस कर. ३६६/२१ खेडा चेंबूर, चेंबूर (पू), मुंबई, ४०००७१ मुंबई, महाराष्ट्र, भारत. | |
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ३,१५,६१,१११/- (रुपये तीन कोटी पंधरा लाख एकसष्ट हजार एकशे अकरा फक्त) |
| लिलावाची तारीख | १ सप्टेंबर २०२५ |
| राखीव किंमत | रु. ४,०८,८०,७००/- (रुपये चार कोटी आठ लाख ऐंशी हजार सातशे फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २५ ऑगस्ट २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | २८ ऑगस्ट २०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १ सप्टेंबर २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख: ३० जुलै २०२५ — एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई — अधिकृत स्वाक्षरी

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
Mobile: +91 8451942710 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सार्वजनिक सूचना खालीलप्रमाणे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/सह कर्जदार/गॅरंटीदार यांना देण्यात येत आहे की खाली दिलेल्या शेड्यूलमध्ये वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड **["ARGFL"]**(सुरक्षीत कर्जदार) कडे कर्ज खाता क्रमांक **ARGFL/SME-LAP/MUM-1/1481 & APPL00008546** अंतर्गत ठेवलेली आहे, हिचा विक्रीचा विचार ई-ऑक्शनद्वारे **https://www. bankeauctions.com** या संकेतस्थळावर त्याच शेड्यूलमध्ये विशेषत: दिलेल्या तारखेला जस आहे तसे आणि जस आहे काय आणि जसे आहे तसा आधारावर करण्यात येईल. या विक्रीचा उद्देश कर्जदार/सह कर्जदार/गॅरंटीदार यांच्याकडून दिलेल्या शेड्यूलमध्ये विशेषत: दिलेली एकूण रक्कम आणि त्यावर संबंधित व्याज आणि इतर खर्च व शुल्क यांची वसुली करणे आहे, जोपर्यंत रक्कम पूर्णपणे वसूल केली जात नाही.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स मुस्कान ट्रेडिंग कंपनी, दुकान, रूम नंबर २, बीके नंबर ८५, देवजी पॅलेस, एसईएस स्कूल जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर-१, ठाणे: ४२१००१. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती रिंकू सुरेंद्र छाब्रा, फ्लॅट नंबर १०१, पहिला मजला, विंग ई ०२, रोझवुड योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. (३) श्री. सुरेंद्र सिंग डी. छाबरा, फ्लॅट क्रमांक १०१, पहिला मजला, विंग ई ०२, रोझवुड योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. (४) मेसर्स शुभम टेक्सटाईल्स, दुकान, रूम क्रमांक २, बीके क्रमांक ८५, देवजी पॅलेस, एसईएस स्कूल जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर-१, ठाणे: ४२१००१. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक १०१, पहिला मजला, विंग ई ०२, योगीधाम ई-२, रोझवुड सीएचएस, योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. | |
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | **ARGFL/SME-LAP/MUM-1/1481** ४२,८८,५८८/- (रुपये बेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे अठ्ठ्याऐंशी फक्त) |
| | **APPL00008546** २१,३१,२४२/- (रुपये एकवीस लाख एकतीस हजार दोनशे बेचाळीस फक्त) |
| लिलावाची तारीख | १ सप्टेंबर २०२५ |
| राखीव किंमत | रु. ६७,०२,७५०/- (रुपये सत्तावन्न लाख दोन हजार सातशे पन्नास फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २५ ऑगस्ट २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | २८ ऑगस्ट २०२५ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १ सप्टेंबर २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख: ३० जुलै २०२५ — एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई — अधिकृत स्वाक्षरी